# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


दिनांक 17/12/2021 (शुक्रवार)

---

### विनयभंग करणाऱ्या आरोपीला कोर्टातुन शिक्षा

पो.स्टे. वेलतुर :– दिनांक 03/01/2019 चे 15.32 वा. दरम्यान फिर्यादी यांच्या रिपोर्ट वरुन पो.स्टे. वेलतुर येथे अप. क्र. 01/2019 कलम 354, 354 (अ) भादवी सहकलम 8, 10, 12 बाल लैगींक अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा नोंद झालेला होता.

दिनांक 29/12/2018 चे 15.30 वा. ते 18.30 वा. दरम्यान 15 वर्षीय पिडीत/फिर्यादी हि गोठणगाव करांडला अभ्यारण्य येथे जंगलसफारी बस मधून बिबटया पाहत असतांना आरोपी नामे – मनोज जगन्नाथ काकडे, वय 29 वर्ष रा. शांती नगर कॉलनी नागपूर याने पिडीतेच्या मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करून तिचा विनयभंग केला. आरोपीला दिनांक 04/01/2019 दरम्यान अटक करण्यात आली.

सदर प्रकरण्याचे तपास तत्कालीन महिला पोलीस उपनिरीक्षक आरती उघडे, पो.स्टे. वेलतुर यांनी करून सदर प्रकरण न्याय प्रविष्ठाकरीता मा. कोर्टामध्ये सादर केले. आज दिंनाक 17/12/2021 रोजी मा. कोर्ट विद्यमान न्यायाधीश श्री. आर.आर.पटारे, अतिरीक्त जिल्हा सत्र न्यायाधिश, नागपूर यांनी वरील नमुद आरोपीला कलम 354 भादवी आणि 12 बाल लैगींक अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये 1 वर्षाचा साधा कारावास व 5,000/–रू. दंड व दंड न भरल्यास 1 महिना साधी शिक्षा, कलम 8 बाल लैगींक अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये 3 वर्ष साधा कारावास व 5000/–रु. दंड व दंड न भरल्यास 1 महिना साधा कारावास तसेच कलम 10 बाल लैगींक अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये मध्ये 5 वर्ष साधा कारावास व 5000/–रु. दंड व दंड न भरल्यास 3 महिण्याचा साधा कारावास शिक्षा ठोठावली आहे.

सरकारचे वतीने एपीपी श्रीमती. आगलावे यांनी काम पाहीले. कोर्ट कामात पैरवी अधिकारी म्हणुन सहायक पोलिस निरीक्षक श्री. किशोरकुमार वैरागडे तर कर्मचारी सहा.फौज. श्री. भवानीप्रसाद मिश्रा, रमेश धामणे, पोहवा श्री. सुनिल डोंगरे, पोलिस अमलदार अशफाक शेख यांनी मदत केली आहे.

### चोरी

पो.स्टे. मौदा :– अंतर्गत 11 कि.मी. अंतरावरील मोहगाव शेत शिवार येथे दिनांक 12/12/2021 चे 10.00 वा. ते दिनांक 14/12/2021 चे 09.00 वा. दरम्यान फिर्यादी नामे– सुरेश श्यामराव थोटे वय 62 वर्षे रा. मोहगाव ता.मौदा फिर्यादी यांचे मोहगाव शेत शिवारातील शेतात ठेवलेले कल्टीवेटर किंमती 12,000/–रू. मुद्देमाल अज्ञात आरोपीने चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. मौदा येथे आरोपीविरुध्द कलम 379 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार कुथे मो.नं. 9764007720 हे करीत आहे.

## दुखापत

पो.स्टे. बोरी :– अंतर्गत 10 कि.मी. अंतरावरील दुधा गावा चा रोड येथे दिनांक 15/12/2021 चे 22.30 वा.दरम्यान फिर्यादी नामे– अभिषेक सतिश वाघमारे वय 21 वर्ष रा. धनराज बन्सोड दुधा ता. जि. नागपुर हा रिलायन्स स्मार्ट पॉईंट बुटीबोरी येथे काम करीत करतो. त्याची मोटारसायकल घेउन तो कामावरून परत दुधा गावाच्या रोडने घरी जात असतांना त्याला एमएच– 31/बीबी– 1657 क्रमांकाची चार चाकी गाडी मधील तीन ते चार आरोपीतांनी रस्त्यात अडवुन त्याला काही कारण नसतांना शिवीगाळ करून मारहाण केली. यानंतर चार चाकी गाडी मधील एका आरोपीने गाडीतील काडी काढुन फिर्यादीच्या डोक्यावर मारून जखमी करून तेथुन पळुन गेले. फिर्यादी याने आपला उपचार करून उपचाराचे कागदपत्र घेवुन पोस्टे. बोरी ला गुन्हा नोंद केला.

. सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. बोरी येथे आरोपीविरुध्द कलम 324, 341, 504, 34 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सपोनी श्री साखरकर तपास पोलिस हवालदार असलम मो नं 8668816049 हे करीत आहे.

## मोटरसायकल चोरी

पो.स्टे. रामटेक :– अंतर्गत 01 कि.मी. अंतरावरील मौजा रामटेक सुपर मार्केट रामटेक येथे दिनांक 15/12/2021 चे 19.00 वा. चे 20.00 वा. दरम्यान फिर्यादी नामे– मयुर शैलेंद्र कोल्हे, वय 28 वर्ष, रा. काचुरवाही ता. रामटेक याची एमएच– 40/ बिझेड– 3938 क्रमांकाची बजाज पल्सर 150 मोटरसायकल मातोश्री मेन्स कलेक्शन दुकानासमोर रोडवर ठेवलेली होती. फिर्यादी हा दुकानात कपडे घेण्यास गेला असता त्याची कि. 50,000/–रू. ची मोटरसायकल अज्ञात आरोपीने चोरून नेली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. रामटेक येथे आरोपीविरुध्द कलम 379 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार सदाशिव काठे मो.नं. 9084627285 हे करीत आहे.

## अकस्मात मृत्यू

पो.स्टे. कळमेश्वर :– अंतर्गत मौजा कळमेश्वर ग्रामीण रूग्णालय येथे दिनांक 11/12/2021 चे 12.40 वा. ते दिनांक 16/12/2021 चे 07.45 वा. दरम्यान श्यामराव वंजारी (मृतक), वय 55 वर्ष हा लावारीस स्थितीत मिळून आला. त्याची प्रकृती खराब असल्याने त्याला ग्रामीण रूग्णालय कळमेश्वर येथुन पोलिस शिपाई संदीप वाघमारे यांनी मेयो हॉस्पीटल नागपूर येथे वार्ड क्र.24 भरती केले होते. उपचारादरम्यान तो दिनांक 16/12/2021 चे 07.45 वा. तेथील डॉक्टरांनी तपासुन मृत घोषित केले मेयो पोलीस बुथ याचे सुचनेवरून सदर मर्ग नोंद.

सदर प्रकरणी सरतर्फे पोलिस नाईक तभाने यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. कळमेश्वर येथे कलम 174 जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास सफौ पाली हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर